NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची धर्मचिकित्सा

**डॉ. रवींद्र पांडुरंग भणगे,** प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

मो. नं. 9420522872 Mail : ravindrabhanage105@gmail.com

---

**प्रस्तावना:**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे धर्मचिकित्से संबंधीच्या विचारावर चर्चा करणे हे आजच्या धर्माधिष्ठित राजकारणाला मिळणाऱ्या पाठिंब्याच्या काळामध्ये धर्माधिष्ठित राजकारणाची चिकित्सा करणे म्हणजे एक आव्हानच आहे. छत्रपती शाहू महाराज यांचा काळ, तत्कालीन परिस्थिती आणि आजची परिस्थिती या दोघांची तुलना करताना शाहू महाराजांनी त्या काळात मांडलेले विचार आणि आजच्या काळात त्याची प्रासंगिकता जरी असली तरी त्याची तुलना करणे, अभिप्राय व्यक्त करणे हे अभ्यासकांच्या जिवावर बेतणारी गोष्ट आहे त्यामुळे अशा प्रकारच्या विषयांवर लिखाण करणे म्हणजे संकट ओढवून घेण्यासारखेच आहे. असं असलं तरी या विषयावर मांडणी करण्याची कसरत या ठिकाणी अभ्यासक या संशोधन पेपर मध्ये करत आहे. राजर्षी शाहू महाराजांनी ज्या व्यवस्थेच्या आणि प्रवृत्तीच्या विरोधामध्ये अखंड लढा दिला आज त्यांना पुन्हा नव्याने सुगीचे दिवस आलेले आहेत. धर्म, कर्मकांड, जातिवाद यामुळे पुन्हा समाजव्यवस्था मागे फेकली जाण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे नव्याने मंथन होणे गरजेचे आहे.

युरोपीय देशांमध्ये विज्ञानाचा प्रसार झाल्यानंतर सुरू झालेल्या प्रबोधनाच्या युगाचा प्रसार सर्व जगभर झाला. युरोपीय देशांनी भारतात आपल्या साम्राज्याचा विस्तार केल्यानंतर पाश्चिमात्य शिक्षण व विज्ञानवादी दृष्टीची निर्मिती भारतीयांच्यामध्ये रुजू लागली यातून भारतात प्रबोधनाची चळवळ सुरू झाली. या चळवळीने बुद्धीप्रामाण्यवादाचा आधार घेऊन सामाजिक सुधारणा व धर्मचिकित्सेला सुरुवात केली. भारतामध्ये ज्या प्रदेशात ब्रिटिशांनी मोठ्या प्रमाणामध्ये शिक्षण प्रसाराचं कार्य केलं त्या प्रदेशांमध्ये पुनरुज्जीवनवादी चळवळींचा विकास झाला. खास करून बंगाल, पंजाब, मुंबई व मद्रास हे चार प्रांत पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीची केंद्रे म्हणून विकसित झाले आणि या प्रदेशांमध्ये या चळवळींना मोठ्या प्रमाणात लोकाश्रय मिळाला. या चळवळीने सामाजिक व धार्मिक क्षेत्रात पुनरुत्थानाचे कार्य केले. या चळवळीतील नेत्यांनी कार्यकर्त्यांनी केलेल्या भरीव कामगिरीमुळेच धार्मिक व सामाजिक क्षेत्रात भारतात परिवर्तनाची युग अवतरले विविध समाजांच्या स्थापनेच्या माध्यमातून ही चळवळ भारतभर पसरली.

पहिल्या टप्प्यात या चळवळीने बंगालमध्ये ब्राह्मो समाजाच्या माध्यमातून पंजाबमध्ये आर्य समाजाच्या माध्यमातून महाराष्ट्रात प्रार्थना समाज व सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला चालना दिली. तत्कालीन इतर समाज सुधारकांनी ही चळवळ विविध समाजांच्या माध्यमातून पुढे नेण्याचे काम केलं. हिंदू समाज व्यवस्थेतील चातुर्वर्ण्यव्यवस्थेवर प्रखर टीका करून धर्माधिष्ठित अनिष्ट चालीरीती रुढी, प्रथा, परंपरा यांच्यावर हल्ला करून त्या माणुसकीला कशा काळीमा फासणाऱ्या आहेत आणि त्या दूर करण्यासाठी काय केलं पाहिजे यासंबंधीची चिकित्सा या टप्प्यात अनेक समाजसुधारकांनी केली हे करत असताना अनेक समाजसुधारकांना प्रस्थापित धर्ममार्तंडाच्या विरोधाला सामोरे जावे लागले. हा कालखंड अतिशय आव्हानात्मक होता. दुसऱ्या टप्प्यात राजर्षी शाहू महाराज, ईश्वरचंद्र विद्यासागर, राम स्वामी पेरियार इत्यादी सुधारकांनी प्रयत्न केले. महाराष्ट्रामध्ये राजर्षी शाहू महाराज यांनी ब्राह्मणेत्तर चळवळीचे नेतृत्व सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून केले आणि त्यांनी महाराष्ट्रामध्ये सुरू केलेल्या धर्म चिकित्सेच्या चळवळीस, कार्यास त्यांच्या नेतृत्वामुळेच एक वेगळा आयाम प्राप्त झाला. समाज व्यवस्थेवर असणाऱ्या उच्च वर्णीयांच्या मक्तेदारीच्या विरोधातील लढयाचे नेतृत्व केले. वेदोक्त प्रकरणी उच्चवर्णीयांच्या

मक्तेदारीचा स्वतः अनुभव घेतल्यावर मी राजा असून उच्चवर्णीयांच्याकडून मला अशा प्रकारची वागणूक मिळत असेल तर सर्वसामान्य जनतेची किती भयावह स्थिती असेल हे त्यांनी पाहिले, अनुभवले आणि अशा अन्यायकारक विषमतामुलक व्यवस्थेला आव्हान देऊन ती व्यवस्था कायमस्वरूपी बदलण्यासाठी त्यांनी आपल्या हाती असलेल्या राजसत्तेचा वापर करून आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने प्रस्थापित व्यवस्था बदलण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यांनी सुरू केलेल्या प्रयत्नातून सर्व समाजव्यवस्था ढवळून निघाली या काळात शाहू महाराज हजारो वर्षापासून दबलेल्या, पिचलेल्या लोकांचा आवाज बनले आणि त्यांनी ही चळवळ उचलून धरली विकसित केली आणि ती पुरोगामी महाराष्ट्राच्या निर्मितीला उपकारक ठरली. महाराष्ट्रभर ही चळवळ पसरल्यानंतर महाराष्ट्रात पुरोगामी विचारांची पेरणी राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेतून झाली. बुद्धीप्रामाण्यवाद, विवेकवादावर विश्वास ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांच्या व नेत्यांच्या जोरावर या चळवळीने महाराष्ट्रभर धर्मचिकित्सा करून समाज सुधारणांचे, परिवर्तनाचे प्रयत्न केले. आज महाराष्ट्र ही पुरोगामी विचाराचे राज्य म्हणून जे ओळखले जाते त्याच श्रेय राजर्षी शाहू महाराजांना द्यावे लागेल.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची धर्मचिकित्सा:**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना अंतर्गत शत्रूंशी सामना करून उद्दिष्ट प्राप्तीसाठी मेहनत करावी लागली. भारताच्या सामाजिक क्षेत्रातील पुनरुत्थानाचे कार्य त्यांना करावे लागले. त्यासाठी प्रचलित समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व प्रथा परंपरांचा पुनर्विचार करून त्यांची मांडणी करावी लागली. शाहूंच्या विचार कार्यातून समाजातील असे एकही क्षेत्र सुटले नाही की ज्याचा शाहू महाराजांनी विचार केला नाही. आर्य समाजाचा त्यांच्यावर सुरुवातीच्या काळात जो पगडा पडलेला होता तो केवळ त्यांची भूमिका पटल्यामुळे परंतु जी तत्वे त्यांना योग्य वाटली नाहीत ती वगळून त्यांनी आर्य समाजाच्या तत्वाचा स्वीकार केला. तत्कालीन हिंदू धर्मव्यवस्थेचा कारभार व व्यवहार सर्वसामान्य हिंदू पर्यंत पोहोचला पाहिजे सर्व लोकांना या व्यवहारांमध्ये सामील होता आले पाहिजे. विशिष्ट वर्गाचे हिंदू व्यवस्थेवर निर्माण झालेले नियंत्रण दूर करुन सर्वांना तो जीवन मार्ग उपलब्ध झाला पाहिजे. अशा प्रकारची भूमिका राजर्षी शाहू महाराजांनी घेतली त्यांचे विचार हे उदारमतवादी धर्मविचार होते. सत्याचा शोध घेणे आणि घडणाऱ्या घटनांशी क्रियाशील संबंधातून समाजामध्ये नवीन समाजमूल्ये, तत्त्वज्ञान निर्माण करणे, जे पटले तेच स्वीकारणे, जे विचार पटले नाहीत त्याबाबत दुजाभाव त्यांनी बाळगला नाही मतभेद असणे म्हणजे शत्रुभाव नव्हे हा आचार, विचार शाहूंनी समाजामध्ये रुजवला. धर्माचा विचार हा उदारमतवादी असला पाहिजे लोककेंद्री असला पाहिजे, सर्व लोकांना धर्म अधिकार प्राप्त झाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती धर्मविचारांवर उच्चवर्णीयांचा पडलेला पगडा दूर करून, कोणत्याही एक्षा धर्म, धर्मपंथाच्या आचरणावर विश्वास न ठेवता इतर सर्व धर्मांचा, धर्मपंथांचा विचार स्वीकारणारी भूमिका त्यांनी घेतली. तसे पाहिले तर वेदोक्त प्रकरणामुळे ते ब्राह्मणेत्तर चळवळीकडे ओढले गेले. व्यक्ती म्हणून लोकांना कसे जगता येईल हे पाहणारा त्यांचा उदारमतवाद होता सर्व सामाजिक घटकांचा विचार करून सर्व समावेशक भूमिका घेणारे त्यांचे धार्मिक विचार होते. त्यांनी धार्मिक क्षेत्रात अनेक सुधारणा घडवून आणल्या हे करण्यापाठीमागे समाजकल्याण हा त्यांच्या विचाराचा केंद्रबिंदू होता धार्मिक प्रतिष्ठानाकडे असणारा पैसा शैक्षणिक कार्यासाठी वळवणारे ते पहिले ते राजर्षी होते. धार्मिक कारणावरून जरी टिळकांशी मतभेद झाले असले तरी त्यांनी शत्रुभाव बाळगला नाही समाजाचे विघटन टाळण्यासाठी सामाजिक सलोखा गरजेचा आहे अशा पद्धतीची भूमिका त्यांनी घेतली त्यांच्या भूमिकेतील उदारमतवादी अधिष्ठान असलेला धर्मविचार आजही व्यवहार्य व औचित्याचा आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या 42 वर्षाच्या आयुष्यामध्ये धर्माचे खरे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला. प्रबोधनाच्या चळवळीची ते एक अपत्य होते तत्कालीन समाजामध्ये त्यांनी नवविचारांचे आकलन करून त्यांची समाजामध्ये पेरणी केली समाज सुधारणा चळवळीचे विचारांची आकलन करून घेत

असताना त्यांचा अनेकांशी संबंध आला खास करून ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, थिऑसॉफिकल सोसायटी आणि वेगवेगळे धर्म यातील तत्त्वज्ञान व मर्म जाणून घेण्याचा, समजून घेण्याचा त्यांनी आपल्या पातळीवर प्रयत्न केला आणि त्यातील खरे खोटेपणा तपासून त्याचा मतितार्थ ओळखून समाजासाठी त्यातील जे फायदेशीर आहे त्याचाच स्वीकार करून आपली धर्माबाबतची भूमिका त्यांनी निश्चित केली त्यांची धर्मचिकित्सा ही प्रामुख्याने तीन पातळयावर आपणास पहावयास मिळते पहिली धर्म व धर्म श्रद्धा त्यांचे महत्त्व आणि प्रस्तुतता या अंगाने त्यांनी आपली भूमिका विशद केली दुसरी समाज व धर्म सुधारणा कशा झाल्या पाहिजेत प्रबोधन कशा रीतीने झालं पाहिजे यासाठी त्यांनी मांडलेल्या भूमिका, घेतलेले निर्णय यातून शंकराचार्यांना दिलेले आव्हान आणि क्षात्र जगतगुरु पिठाची केलेली स्थापना आणि तिसऱ्या पातळीवर धर्म व समाज सुधारणा चळवळीचा उपयोग करून समाजामध्ये सामाजिक, शैक्षणिक, जातीय सुधारणांचा प्रयत्न करणे आणि त्याचा फायदा समाजाला करून देणे या तीन पातळयावर शाहू महाराजांनी आपली धर्मचिकित्सा केलेली आढळून येते. धर्माचा पारंपारिक विचार त्यांनी अमान्य केला आणि सत्यशोधक चळवळीला ब्राह्मणेत्तर चळवळीला पुढे नेण्याचे प्रयत्न केले. सत्यशोधक विचारांना मान्यता देऊन परिवर्तनाची चळवळ पुढे नेली महात्मा फुलेंनी मांडलेली राखीव जागांची कल्पना शाहू महाराजांनी मान्य करून त्यासंबंधीचा अध्यादेश 1902 ला कोल्हापूर संस्थानांमध्ये लागू केला. शाहू महाराजांनी महात्मा फुले, स्वामी दयानंद, सत्तेंद्रनाथ सेन यांच्याकडून धार्मिक विचार घेतले. आर्य समाजाच्या प्रभावातून त्यांनी धर्मचिकितेला जरी सुरुवात केली असली तरी 'वेदांकडे चला वेदांचा अधिकार सर्वांना' याचा काही प्रमाणात त्यांच्यावर प्रभाव पडला परंतु ही चळवळ आपल्या ध्येयापासून भरकटल्यानंतर तिच्यापासून अंग बाजूला काढून घेतले काही काळ थिऑसॉफिकल सोसायटीच्या प्रभावाकडे सुद्धा ते आकर्षित झाले होते शाहू महाराजांचा धर्मव्यवस्थेला विरोध होता पण धर्मास किंवा श्रद्धेच विरोध नव्हता त्यामुळे त्यांनी आर्य समाजापासून बाजूला होण्याचा निर्णय घेतला. प्रत्येक धर्मातील चांगल्या बाबींचा स्वीकार करून त्यांचा स्वीकार करण्याची त्यांची वृत्ती होती

राजर्षी शाहू महाराजांचे धार्मिक विचार त्यांच्या शालेय वयातच दिसू लागले. शिकत असताना १८९१ मध्ये अभ्यास सहलीच्या निमित्ताने ते बनारसला गेले. त्यांचे गुरु फ्रेझर सोबत होतेच. तेथील मणिकर्णिका कुंडात स्नान करूनच देवदर्शन, असा प्रघात होता; पण कुंडातील घाण पाणी पाहून शाहूंनी त्यामध्ये स्नानास नकार दिला. यावरून पुजाऱ्यांमध्ये खळबळ माजली; पण शाहू महाराज ठाम राहिले. धर्मातील अनिष्ठ चालीरितीवर प्रहार करण्याची शाहू महाराजांची ही सुरुवात होती. यावेळी त्यांचे वय होते १७ वर्षे. पुढे याच विचाराचे गारुड त्यांच्यावर राहिले. श्रावणीत पंचगंगा घाटावर शाहू महाराज स्नान करताना त्यांच्यावर केले जाणारे संस्कार हे पुराणोक्त मंत्राद्वारे न करता वेदोक्त मंत्राद्वारे करावेत असा आदेश त्यांनी दिल्यानंतर महाराष्ट्राच्या धार्मिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात उलथापालथ सुरू झाली त्यातून वेदोक्त प्रकरणाला सुरुवात झाली पुढे त्याचे रूपांतर ब्राह्मणेत्तर चळवळीमध्ये झाले. यानंतर त्यांनी धर्मशुद्धीकरणाकडे अधिकच लक्ष दिले. भास्करराव जाधव यांना सत्यशोधक समाजाच्या प्रसारासाठी मदत केली. आपला धर्म तर सोडायचा नाही, पण त्यात इतर धर्मातील चांगल्या गोष्टींचा समावेश करून धर्माला अधिक मानवतावादी कसे करता येईल, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. देशात, राज्यात त्यावेळी सामाजिक सुधारणांचे वारे जोरात होते. धार्मिक चळवळी सुरू होत्या, धर्मातील अनिष्ठ चालीरिती विरोधात आवाज उठवला जात होता. शाहू महाराजांनी आर्य समाज, प्रार्थना समाज, थिऑसॉफीकल सोसायटी यांच्या माध्यमातून धर्मसुधारणा सुरू केल्या.

शाहू महाराजांनी वैदिक पाठशाळा स्थापन स्थापन करून त्याद्वारे धार्मिक आचरण करण्यास प्रोत्साहन दिले. बहुजन समाजातील पुरोहित तयार व्हावेत म्हणून वैदिक स्कूल सुरू केले. शंकराचार्यांचे निधन झाल्यानंतर त्यांनी तत्त्वज्ञानात पीएच.डी. मिळवलेले डॉ. कुर्तकोठी यांची नियुक्ती करून समानतेचा विचार

कसा रुजेल, हे पाहिले; पण कुर्तकोठी यांनी प्रवचनाला दलितांना कुंपणाबाहेरच बसवल्याचे निदर्शनास आल्यानंतर आपण कुर्तकोठींना ओळखण्यात चूक केल्याचे शाहू महाराजांच्या लक्षात आले. हा प्रयत्न फसल्यावर त्यांनी बहुजनातील बेनाडीकर यांना क्षात्र जगदगुरु म्हणून बसवले. माणूस आणि देव यांच्यात दलाल म्हणून काम करायचे नाही. माणसांनी खांद्यावरून वाहून नेणाऱ्या पालखीत बसायचे नाही, अशा अटी त्यांना घातल्या. जगदगुरुंना घोडागाडीची सोय करून दिली. असे अनेक पायंडे आहेत, जे काळाच्या पुढे जाऊन समाजसुधारक शाहू महाराज धर्मसुधारकही कसे होते, हे सिद्ध करतात.

**सारांशः**

शाहू महाराजांनी ब्राह्मण पुरस्कृत धर्माला विरोध करून सत्य धर्माचा पुरस्कार करणाऱ्या विविध समाजांच्या भूमिका मान्य करून स्वीकारून सुधारणांवर भर दिला. ज्या पद्धतीने जपानमध्ये सामुराई जातीने आपले वरिष्ठ हक्क दर्जा यांचा त्याग केला त्याच पद्धतीने भारतातील उच्चवर्णीय ब्राह्मण व क्षत्रियांनी आपल्या उच्च स्थानाचा त्याग केला पाहिजे तरच समाजामध्ये वर्णव्यवस्था नष्ट होऊन समताधिष्ठित समाज व्यवस्था निर्माण होऊ शकेल. जन्म आणि संपत्तीवर आधारित सामाजिक स्तर नष्ट झाला पाहिजे. प्रशासकीय सेवेत एकाच जातीच्या कर्मचाऱ्यांची भरती बंद होऊन सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे. जातीअंतासाठी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना प्रोत्साहन मिळाले पाहिजे, शैक्षणिक सुधारणा घडून आल्या पाहिजेत अशा क्रांतिकारक भूमिका 1918 नंतर घेऊन त्या प्रत्यक्षात आणण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. स्वत: राजा असतानादेखील राजर्षी शाहू महाराजांना अंबाबाई मंदिरात दर्शन देण्यावरून वाद निर्माण झाला. तत्कालीन प्रथांनुसार परदेश प्रवास करून आल्यावर संबधीत माणसाची धर्मशुद्धी केली जात होती. समुद्र उल्लंघन करून आल्यावर केल्या जाणाऱ्या या विधीला शाहू महाराजांनी नकार दिला. यावरून त्यांना दर्शन घेण्यास मनाई करण्यात आली; पण शाहू महाराज ठाम राहिले. वाद मिटवून पुढे दर्शनही सुरू राहिले. जो धर्म माणसाला माणसासारखे वागवतो तोच खरा धर्म, हे तत्त्वज्ञान शाहू महाराज खऱ्या अर्थाने जगले. मूळ धर्माला कोठेही धक्का न लावता त्यांनी काळाच्या पुढे जाऊन मांडलेले धर्म विचार आजच्या घडीलाही तितकेच दिशादर्शक, क्रांतिकारक आहेत. संस्थान इंग्रजांच्या अंकीत असतानाही त्यांनी धर्मसुधारणेच्या प्रयत्नांना जे बळ दिले, त्यातून सत्यशोधक धर्माचा विचार अधिक बळकट झाला. आजही याच विचारांमुळे कोल्हापूर महाराष्ट्रातच नव्हे तर देशात पुरोगामी म्हणून ओळखले जाते. कोल्हापुरातील जाती-धर्मातील वीण घट्ट आहे, त्याचे मूळ शाहू महाराजांच्या धर्मविचारात सापडते. त्यांनी धर्मसुधारणाबाबत केलेले कार्य काळाच्या खूप पुढे पाहणारे होते.

राजर्षी शाहू महाराजांची धर्मचिकित्सा ही उदारमतवादावर माणुसकीच्या धर्मतत्वावर आधारलेली होती. माणसाला माणसाप्रमाणे जीवन जगता आले पाहिजे अशा पद्धतीची साधी सरळ भूमिका त्या पाठीमागील होती समानतेच्या तत्वावर सर्वांना समान जीवन जगता आले पाहिजे. सर्वांना समान अधिकार मिळाले पाहिजेत. सर्वांचा समान पातळीवर उत्कर्ष झाला पाहिजे यासाठी त्यांनी अविरत संघर्ष केला आज महाराष्ट्राची समानतेच्या तत्त्वा आधारित जी काही वैचारिक जडणघडण झाली आहे त्याचे श्रेय निश्चितच फुले शाहू आणि आंबेडकर यांनाच द्यावे लागेल

**संदर्भ**


- डॉ अशोक चौसाळकर, राजकीय विश्लेषक व अभ्यासक, कोल्हापूर यांचे व्याख्यान
- श्री किशोर बेडकीहाळ, राजकीय विश्लेषक व अभ्यासक, सातारा यांचे व्याख्यान
- डॉ. देविकाराणी पाटील, नव्या पिढीतील इतिहास संशोधक कोल्हापूर यांचा लेख